# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 11.09.2024** **वार – बुधवार**

---

**दूध**

पुणे जिल्ह्यातील दूध प्रकल्पांना अनुदान मिळण्यास सुरुवात झाली आहे. शिरूर तालुक्यातील साईप्रसाद दूध प्रकल्पातील ५१३ दूध उत्पादक शेतकऱ्यांना ११ लाख ७१ हजार रुपये तर, इंदापूर तालुक्यातील श्रीराम दूध प्रकल्पातील ६९ दूध उत्पादक शेतकऱ्यांना ३ लाख २५ हजार असे एकंदर ५८२ दूध उत्पादक शेतकऱ्यांना १४ लाख ९६ हजार रुपयांचं अनुदान खात्यावर जमा करण्यात आलं आहे. आता दूध प्रकल्पांकडून माहिती मिळण्यास चांगला प्रतिसाद मिळत आहे. ११४ दूध प्रकल्पांपैकी १८ दूध प्रकल्पांनी अनुदान मिळण्याबाबत प्रस्ताव दाखल केले आहेत. उर्वरित दूध प्रकल्पांकडे दूध उत्पादक शेतकऱ्यांनी लवकरात लवकर माहिती द्यावी, असं आवाहन पुणे जिल्हा दूध विकास अधिकारी सतीश डोईफोडे यांनी केलं आहे.

**एकता नगर**

सिंहगड रस्त्यावरील एकतानगरमध्ये मुठा नदीच्या निळ्या रेषेच्या आतील बांधकामांचं पुणे महापालिकेनं सर्वेक्षण केलं आहे. यामध्ये सुमारे १०३ इमारतींमधील १ हजार ३८३ सदनिका, ६७ दुकानांचं पुनर्वसन करण्यासाठी आराखडा तयार केला जाणार आहे. त्यासाठी ६९८ कोटी रुपयांचा खर्च येणार आहे. पुणे शहर आणि खडकवासला धरण प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या मुसळधार पावसामुळं २५ जुलैला मुठा नदीला पूर आला. त्यामध्ये एकतानगर भागातील अनेक सोसायट्यांमध्ये पाणी शिरलं होतं.

**कचरा**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच कचरा व्यवस्थापनाची सवय लागावी आणि महापालिकेच्या शाळा कचरामुक्त करण्यासाठी महापालिकेच्या वतीनं शाळा स्तरावर कचरामुक्त शाळा हा उपक्रम राबवण्यात येणार आहे. त्यासाठी येणाऱ्या खर्चास महापालिकेच्या स्थायी समितीमध्ये मंजुरी देण्यात आली. तसंच पुणे जिल्ह्यातील २० शिक्षकांचं पिंपरी चिंचवड महापालिकेत वर्गीकरण करण्याचाही प्रस्तावाला आयुक्त शेखर सिंह यांनी या बैठकीत मान्यता दिली.

**सायकल**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाचं औचित्य साधून आरोग्य आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचं महत्व रुजवण्यासाठी पुण्यात परवा १३ तारखेला सायकल फेरीचं आयोजन केलं जाणार आहे. सायकल वापरण्यास प्रोत्साहन देण्याच्या उद्देशानं हा उपक्रम गेल्या पाच वर्षांपासून आयोजित केला जात आहे, अशी माहिती संयोजिका, राज्यसभा खासदार प्राध्यापक डॉक्टर मेधा कुलकर्णी यांनी दिली.

**शिरोळे**

छत्रपती शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघातील खडकी भागात आमदार सिद्धार्थ शिरोळे यांच्या प्रयत्नांमधून मागील काही महिन्यांत ६ कोटींची विकास कामं पूर्ण झाली असून ५ कोटींच्या विकासकामांना प्राथमिक मंजुरी मिळाली आहे. मंजुरी मिळालेली विकास कामं पुढील काही महिन्यांमध्ये मार्गी लागतील, अशी माहिती शिरोळे यांनी दिली.

**ज्ञान-यशस्वी**

विद्यार्थ्यांनी आधुनिक ज्ञान-तंत्रज्ञान शिकतानाच भारतीय ज्ञान परंपरेची प्रासंगिकता आणि त्यातील तत्वज्ञान समजून घ्यावं असं आवाहन भारतीय ज्ञान परंपरा आणि भगवद्गीतेच्या अभ्यासक रोमा अभ्यंकर यांनी केलं आहे. यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या आंतरराष्ट्रीय व्यवस्थापन विज्ञान संस्थेत भारतीय ज्ञान परंपरा या विषयावरील व्याख्यानात त्या बोलत होत्या. प्राचीन भारतीय ज्ञान परंपरेतील ग्रंथांमध्ये सांगितलेलं तत्वज्ञान आजही सुसंसगत ठरत आहे, आणि त्याचा यथायोग्य वापर केल्यास आपली सध्याची कार्यसंस्कृती आणि नैतिकता अधिक सक्षम होऊ शकते असा विश्वास रोमा अभ्यंकर यांनी वक्त केला.

**हरित**

हायड्रोजन अर्थव्यवस्थेतील आव्हानं, शिक्षण आणि संशोधनाद्वारे सोडविणे या उपक्रमांतर्गत नॉर्वेतील स्टावेंजर विद्यापीठात झालेल्या उन्हाळी कार्यशाळेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विद्यार्थी सहभागी झाले होते. हा उपक्रम नवीन शैक्षणिक धोरण 2020 ला अनुसरून असून विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांमध्ये आंतरवासिता संधी उपलब्ध करून देण्याचं उद्दिष्ट आहे. विद्यापीठाकडून शिवलिंग स्वामी, अनुष्का पवार, श्रुती शिंगणे आणि अमिना चिविलकर या चार विद्यार्थ्यांनी 15 मे ते 15 जुलै या कालावधीत स्टाव्हेंजर विद्यापीठात संयुक्त प्रबंध आणि संशोधन प्रकल्पांद्वारे हायड्रोजन तंत्रज्ञानातील नवकल्पना आणि व्यावहारिक उपाय शोधण्यावर भर दिला.

**निवड**

दलित इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री म्हणजे डिक्की संस्थेच्या पुणे शाखा अध्यक्षपदी ललित बन्सोड यांची निवड करण्यात आली आहे. उद्योग क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल बनसोड यांची निवड करण्यात आली आहे. डिक्की ही देशभरातील दलित उद्योजकांची शिखर संस्था आहे.

**पथक**

पिंपरी शहरातील प्रमुख गणेश विसर्जन घाटांवर महापालिकेच्या वतीनं दुपारी ३ ते रात्री १० वाजेपर्यंत वैद्यकीय पथकांसह सुसज्ज रुग्णवाहिका तैनात ठेवण्यात येणार असल्याची माहिती आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉक्टर लक्ष्मण गोफणे यांनी दिली आहे.

**हॉकी**

पुण्यात सुरु असलेल्या चौथ्या हॉकी इंडिया वरिष्ठ पुरुष आंतरविभागीय राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत आज सकाळच्या सत्रात झालेल्या सामन्यांमध्ये सेवा क्रीडा नियंत्रक मंडळ संघानं तामिळनाडू पोलीस हॉकी संघाचा 6-0 असा धुव्वा उडवत त्यांचं स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आणलं. अन्य लढतीत भारतीय अन्न महामंडळ संघानं आपल्या लौकिकास साजेसा खेळ करत सशस्त्र सीमा बल संघाचं आव्हान 7-0 अशा फरकानं सहज मोडीत काढलं.

पुणे आणि परिसरात उद्या पावसाच्या हलक्या सरी अपेक्षित आहेत. कमाल तापमान 29 अंश सेल्सियस राहील.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**